MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२५० | रविवार दि.०२ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -250 | SUNDAY DT. 02 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


## आडसला खरेदीसाठी गेलेल्या युवकाचा धारूरच्या घाटात अपघात

माजलगाव (प्रतिनिधी)


येथील पंचशील नगरातील दोन तरुण कपडे खरेदीसाठी अडसला गेले असता खरेदी आटपून वापस येत असतात रस्त्यात उभा असलेल्या टिप्परला धडक बसून झालेल्या अपघातात एक जण मरण पावला तर एक जण गंभीर जखमी पावल्याची घटना दि.३० रोजी घडून आली.याविषयी अधिक माहिती अशी की,माजलगाव येथील पंचशील नगर येथील अजय अशोक सुतार आणि अनिकेत तोडकर हे दोघे अजय सुतार यास कपडे घेण्यासाठी अडस याठिकाणी त्यांच्या मोटारसायकल वर दि.३० रोजी गेले होते कपड्याची खरेदी करून वापस येत असताना रस्त्यामध्ये थांबलेले टिप्परला त्यांची जोरात धडक झाली त्यात एक जण गंभीर जखमी झाला असून एक जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याविषयी रीतसर अशी तक्रार अनिकेत तोडकर यांनी टिप्पर चालकाच्या हलगर्जीपणामुळें अपघात होऊन एक बळी गेला अश्या संदर्भात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# वाळू माफियांकडून आता फक्त पालकमंत्री धनंजय मुंडे, गेवराईचे आ. लक्ष्मण पवार यांच्याच गाडीला कट मारणे बाकी?











- गेवराई चे डीवायएसपी नीरज राजगुरु वाळू माफीया यांना पोसण्यास जबाबदार चकलांबा गेवराई तलवाडा पोलीस स्टेशनचे प्रभारी तथा गेवराईचे डीएसपी राजगुरु यांचे कनेक्शन काय?
- गेवराईचे डी वाय एस पी नीरज राजगुरू आपण एकदा आजपर्यंत वाळू माफियांवरती एकूण किती कारवाया केलेले आहेत याची माहिती मीडियासमोर द्याच.
- तहसीलदार खोमणेचे कोतवाल, मंडळ अधिकारी वसुलीमध्ये गुंग. वाळू माफियांची दादागिरी पोलिसांच्या जीवावरच?
- वाळू माफियांकडून हप्ता वसुलीसाठी चकलांबा गेवराई तलवाडा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचे फोन डिटेल तपासले तर सत्य बाहेर पडेल?
- गोदावरी नदी पात्रातून औरंगाबाद अहमदनगर जालना बीड या जिल्ह्यातील वाळू माफी यांचा नंगानाच जवळपास एक हजार वाळूचे वाहने चालतात?
- अवैध वाळू उपसा करून चार जिल्ह्यातील बेसुमार वाळू उपसा करून विकणारा माफिया मालामाल त्यांच्यासोबत पोलीस महसूलचे कर्मचारी ही नोटाच्या गंगेत ?
- वाळू माफियांकडून या अगोदर पोलीस कलेक्टर आणि आता न्यायाधीशाच्या गाडीला कट मारण्याचा प्रयत्न

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन शनी महाराजांच्या दर्शनासाठी खाजगी वाहनाने एक न्यायाधीश राक्षसभुवन येथे दर्शनासाठी आले होते रस्ता लहान आहे तसेच या ठिकाणाहून वाळू भरून जाणाऱ्या दोन वाहनांनी त्यांच्या गाडीला कट मारून भरधाव वेगात निघून गेल्यानंतर सदरील घटनेची माहिती बीड पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना दिली तसेच पोलीस अधीक्षक यांनी दोन्ही वाहनावर कारवाईचे आदेश चकलांबा पोलिसांना दिले. चकलांबा पोलिसांनी या दोन्ही गाड्या ताब्यात घेतले आहेत व एका हायवाने पलायन केले आहे, ही घटना १ जून रोजी सकाळी आठच्या दरम्यान घडली या घटनेने वाळू माफीयांची दादागिरी वाढल्याचे दिसून आहे त्यांनी दादागिरी व गुंडगिरीची हद्द पार केल्याचे गेल्या दोन तीन घटनामुळे दिसून येते.सविस्तर माहिती अशी की चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील राक्षसभुवन शनिचे परिसरात अवैध वाळूच्या तस्करीने थैमान घातला असताना यापूर्वी देखील एका वाळूच्या गाडीने जिल्हा अधिकाऱ्यांच्या गाडीला कट मारला होता तसेच आज बाहेरील जिल्ह्यातील न्यायाधीश हे राक्षसभुवन शनीच्या या ठिकाणी देवदर्शनासाठी आले असता त्यांच्या गाडीला वाळू माफियांनी भरून झालेल्या गाडीला कट मारला सदरील बाबी गंभीर स्वरूपाची आहे

**गेवराई चे डी वाय एस पी नीरज राजगुरूंनी कारवाईसाठी स्वतः रस्त्यावर उतरणे गरजेचे**

माफी यांचा गँगवार या अगोदर सुद्धा झालेला असताना पोलीस प्रशासन काय कारवाई करत आहे का गेवराई तालुक्यामध्ये गोदापत्रांमध्ये वाळू माफियांकडून वर्चस्व कोणत्या गटाचे म्हणून खूप मोठे वाद झालेले काही दिवसापूर्वी खूप मोठा वाद होऊन अनेकांना ते ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल झालेले आहेत यामध्ये वाळूमाफ यांचा नंगाना सुरू असताना प्रत्येक वाळू माफिया हा फक्त पोलिसांच्या जीवावर दादागिरी करत असल्याची चर्चा गोदापात्र शेजारील गावांमध्ये ऐकायला मिळत आहे गोदा पात्राशेजारील गावातील शेतकरी यांना सुद्धा याच वाळूमाफियांकडून धमक्या व दादागिरी ची भाषा वापरण्यात येत आहे. याकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे गेवराईचे डीएसपी राजगुरू यांनी लक्ष घालणे व कारवाया करणे गरजेचे असताना ते शांत का आहेत हे समजू शकले नाही.

या न्यायाधीशांनी ही माहिती बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना दिली तसेच त्यांनी चकलांबा पोलिसांना सदर गाड्यावर कारवाई करण्याची आदेश दिले या तीन वाळूच्या गाड्या होत्या अशी प्राथमिक माहिती आहे परंतु दोन गाड्या चकलांबा पोलीस ठाण्याच्या ताब्यात घेतल्याची माहिती असून या कारवाईत अंदाजे ६० लाख रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान गत आठवड्यात डीवायएसपी धीरजकुमार यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न झाला.

वाळू माफीयांच्या त्यानंतर दोन दिवसानी बोरगाव येथे वाळूच्या व्यवसायातून दोन गटात तुफान राडा झाला होता त्यानंतरही चकलांबा पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळूच्या व्यवसायातून दादागिरी, गुंडगिरी सह गुन्हेगारी वाढली असतानाही चकलांबा ठाणे प्रभारी नारायण एकशींगे यांना अवैध वाळू बंद करण्यात अपयश आलेले दिसून येते.

गेवराई चे डीवायएसपी नीरज राजगुरू हे कारवाई का करत नाहीत बीड इथून एसपी चे पथक या अगोदर सुद्धा याच गेवराई तालुक्यातील गोदापात्रा मध्ये अवैध वाळू उपसा करणाऱ्यांना कारवाई करण्यासाठी गेले असताना त्यांच्यावर सुद्धा हल्ला करण्यात आला माजलगावचे डीएसपी धीरज कुमार यांच्या पथकावरही हल्ला करण्यात आला या अगोदर अनेक पोलीस कर्मचारी महसूलच्या कर्मचाऱ्यावर हल्ले झाले गेवराई तलवाडा चकलांबा या पोलीस स्टेशनच्या कर्मचारी यांच्यावरही हल्ला झाला परंतु या ठिकाणी आज सुद्धा गेवराईचे डी वाय एस पी नीरज राजगुरू हे मूग घेऊन गप्प का आहेत? नीरज राजगुरु यांच्यामुळे वाळूमाफिया यांना बळ मिळत आहे? का असा प्रश्न यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेला पडलेला आहे आता तर हातात झाली कलेक्टर पोलीस महसूल अधिकारी यांना कट मारण्याचा व अवैध वाळू ने भरलेला हायवा घालण्याचे काम वाळू माफियांकडून झाले पण आता तर न्यायाधीशाच्या गाडीवर सुद्धा वाळू माफियांनी गाडी अंगावर घालून कट मारण्याचा प्रयत्न केला आता फक्त गेवराईचे आ. लक्ष्मण पवार व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याच गाडीला आहे अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनतेच्या तोंडून ऐकायला मिळत आहे नीरज राजगुरू हे अवैध धंद्यावाल्यांना पोसण्यासाठी गेवराईला कोणत्या नेत्याच्या विश्वासावर वरिष्ठांच्या आदेशाने डीएसपीचे निरज राजगुरू गेवराई बसलेले आहेत.?

**अवैध वाळू उपसा करून चार जिल्ह्यातील बेसुमार वाळू उपसा करून विकणारा माफिया मालामाल त्यांच्यासोबत पोलीस महसूलचे कर्मचारी ही नोटाच्या गंगेत ?**



## माफियांच्या नंग्या ठेचा

# लोकनेते मुंडे साहेबांचा ३ जूनला दहावा स्मृतीदिन पंकजाताई मुंडे यांचं राज्यभरातील कार्यकर्त्यांना आवाहन

**परळी (प्रतिनिधी)**

**लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा येत्या ३ जून रोजी दहावा स्मृतीदिन असून या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राज्यभरातील समस्त कार्यकर्त्यांना यावर्षी गोपीनाथ गडावर न येता जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा, त्यांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा असं आवाहन केलं आहे. ४ जूनला लोकसभेची मतमोजणी असल्याने आपल्या विजयाचा मोठा ध्वज मुंडे साहेबांच्या चरणी अर्पण करा असंही त्यांनी म्हटलं आहे.**

यासंदर्भात सोशल मिडियावर एक व्हिडिओ जारी करून पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना विनंतीवजा आवाहन केलं आहे. पंकजाताईंनी म्हटलं आहे की,दरवर्षी ३ जून हा दिवस येतो तेव्हा आपल्या सगळ्यांना हृदयामध्ये कालवल्यासारखं होतं. मुंडे साहेबांसारखा नेता, आपलं उर्जास्थान, आपलं शक्तीस्थान, आपलं प्रेरणास्थान, आपलं श्रध्दास्थान..आपल्यातून गेले ३ जून यादिवशी..माझा पिता हरवला, तुमचा नेता हरवला. माझ्या पित्यावर, माझ्या नेत्यावर तुम्ही स्वतःच्या पित्यापेक्षाही जास्त प्रेम केलं. आज दहा वर्षे झाली त्यांना जावून पण तरीही तुम्ही न चुकता ३ जूनला

**यंदा गोपीनाथ गडावर नाही आलात तरी चालेल ; जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा, फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा**

गोपीनाथ गडावर येता. यावेळेस एक योगायोग आलेला आहे तो म्हणजे ३ जूनला मुंडे साहेबांची पुण्यतिथी आहे आणि ४ जूनला लोकसभेची काऊंटिंग आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी सर्व कार्यकर्ते, काऊंटिंग एजंटला ३ जून रोजी संध्याकाळीच बीडला जावे लागते कारण पहाटे उठूनच त्यांना काऊंटिंगसाठी जावे लागते. मला ही अडचण पूर्णपणे लक्षात आहे. आपली सगळ्यांची इच्छा असून



देखील आपल्या सर्वांना यायचं असून देखील ही तळमळ मी समजू शकते. म्हणून मीच तुमची ही अडचण दूर करायचं ठरवलं आहे.

जिथे आहात तिथूनच पुण्यस्मरण करा मी आपल्या सर्वांना नम्र विनंती करते की, आपण जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा. मुंडे साहेबांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा आणि आपण यावर्षी गोपीनाथ गडावर नाही आलात तरी चालेल. ४ जूनला मुंडे साहेबांच्या विजयाचा मोठा ध्वज घेऊन मुंडे साहेबांच्या चरणी आपण हा विजय अर्पित करूया. यावेळेस आपण नाही आलात याविषयी मनामध्ये कुठलेही दुःख बाळगू नका. आपण पुढच्या वेळी मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त खूप चांगले समाजोपयोगी कार्यक्रम करू, त्यावेळी फार मोठया संख्येने आपण उपस्थित रहा. दरवर्षीप्रमाणे आमचं कीर्तन असतं, भोजन असतं ते आम्ही यावर्षी रद्द केलेलं आहे. आपली अडचण टाळावी यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील माझ्या समस्त लोकांना विनंती करते की, यावेळेस ३ जूनला आपण कृपया गोपीनाथ गडावर येवू नये. ही विनंती आपण नक्की मान्य कराल आणि माझ्या या विनंतीचा मान राखाल..एवढीच आपल्याकडून अपेक्षा करते.

# आदर्श देवगाव येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक व ग्रांमपचायत कार्यालय मध्ये जयंती उत्साहात साजरी

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे पुण्यश्लोक, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ग्रामपंचायत कार्यालय देवगाव व पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक येथे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली आहे.. एक अद्वितीय,कर्तृत्ववान वीरांगना,उत्तम प्रशासक, दीन-दुबळ्यांचा आधार, रणरागिनी,जनकल्याणाचे वृत्त घेतलेल्या देशातील एक कुशल प्रशासक म्हणजे अहिल्याबाई होळकर इतिहासाच्या कालपटावर स्त्री व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या शौर्यास व कार्यास शतशः नमन..पुण्यशोक एक कर्तृत्ववान, न्यायी व मुत्सद्दी राज्यकर्त्या




म्हणून आपल्या कामाचा अमीट ठसा भारतीय इतिहासावर उमटविणाऱ्या राज्यकर्त्या, थोर समाजसुधारक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची आज जयंती! फक्त राज्यकारभार न करता आपल्या कारकीर्दीत त्यांनी सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन दिले, तसेच जनहिताला प्राधान्य देत देशभर समाजकार्याचा ठसा देखील उमटवला. आपल्या कर्तृत्वातून इतिहासात अजरामर झालेल्या या राजमातेला विनम्र अभिवादन महान राज्यकर्त्या, कुशल प्रशासक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, हुंडा पद्धतीचे निर्मूलन, अनिष्ट चालीरीती रुढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क अशा कितीतरी महत्वाच्या सुधारणा केल्या. त्यासाठी आयुष्यभर कार्य केले. राजमाता अहिल्यादेवींच्या या लोकोत्तर कार्याचे कृतज्ञ स्मरण करुन त्यांच्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन. या प्रसंगी गावातील सरपंच रामेश्वर दादा सुरवसे, माजी सरपंच ज्ञानेश्वर सुरवसे, उत्तम बप्पा सुरवसे ,महादेव आण्णा सुरवसे, उपसरपंच. राजाभाऊ नाना गवळी पांडुरंग सुरवसे भिमा सुरवसे कुंडलिक सुरवसे प्रभाकर सुरवसे , मुकुंद भैय्या सुरवसे ,राहुल सुरवसे गवळी ज्ञानेश्वर ,गवळी लहु, सुरेश गवळी ,विष्णू पंत गिरगुणे ,संतोष गवळी ,गणेश गवळी ,बंडु पाटील, सखाराम सुरवसे ,डिगाबरं गवळी, तसेच गावातील नागरिक व तरुण मंडळी उपस्थित होते

# १० जून रोजी वाढदिवस साजरा करणार- अनिलदादा जगताप

बीड (प्रतिनिधी)

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांचा येत्या ४ जून रोजी असणारा वाढदिवस काही कारणास्तव सोमवारी दि. १० जून २०२४ रोजी साजरा करणार असल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यलयातून देण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांची लोकप्रियता प्रचंड प्रमाणात असून दरवर्षी अनिलदादा यांचा वाढदिवस शिवसैनिक मोठ्या जल्लोषात आणि आनंदात साजरा करतात. मात्र यावर्षी ३ जून रोजी अनिलदादा जगताप



यांना महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे बैठकीसाठी मुंबई येथे उपस्थित राहायचे आहे. याबरोबरच दि. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. यामुळे अनिलदादा जगताप यांचा ४ जून रोजी असणारा वाढदिवस सोमवारी दि. १० जून २०२४ रोजी साजरा करण्यात येईल व तिथून पुढे बीड जिल्ह्यात अनिलदादा यांच्या वाढदिवसा निमित्त घेण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रम कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन शिवसेना मध्यवर्ती कार्यलयातून करण्यात आले आहे.

# शेतकर्यांना तात्काळ पीक कर्ज वाटप करा :- वैभव शिंदे

**नेकनूर (प्रतिनिधी)**

**खरीप हंगामासाठी सर्वत्र तयारी सुरू झाली आहे. या हंगामात पेरणीसाठी शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि शेतीसाठी पैशांची गरज भासणार आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक कर्जाची नितांत गरज आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व बँकांनी लवकरात लवकर शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करावे.यावर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे.**

अशा संकटाच्या काळात त्यास आर्थिक हातभार लावणे गरजेचे असताना अद्यापही बँकेने पीक कर्ज वाटपास सुरुवात केली नाही. दुष्काळी परिस्थिती मुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी यावर्षी तातडीने पीक कर्ज वाटप करावे. ऐन पेरणी कालावधीत आर्थिक संकट उद्भवू नये म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पीक कर्ज वाटपाचे संबधित अधिकाऱ्यांना आदेश देऊन आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना सहकार्य करावे.दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरीवर्गाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच केंद्र सरकारने खताच्या किंमतीत भरमसाठ वाढ केली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकासाठी केलेला खर्च निघणेही अवघड झालेले आहे. या दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यात येते.जून महिना सुरू होऊनही पीक कर्जाचे वाटप चालू झालेले नाही.त्यामुळे शेतकर्यांपुढे दुहेरी संकट उभे राहिले आहे. मात्र



बँकेकडून अद्याप एकही प्रस्ताव मंजूर करण्यात आला नाही. त्यामुळे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची दखल घेऊन सर्व बँक शाखेला आपल्या स्तरावरून सूचना द्याव्यात व शेतकर्यांना लवकरात लवकर पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.

# बुवा बाबांच्या नादी लागून स्वतःचा सत्यानाश करुन घेऊ नका.. सत्यपाल महाराज

बीड (प्रतिनिधी)

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंती निमित्त भारतीय शेतकरी कामगार पक्ष आयोजित व गंगाई सामाजिक प्रतिष्ठान संयोजित शिदोड येथे समाज प्रबोधनकार सुप्रसिद्ध किर्तनकार, सप्त खंजिरीवादक सत्यपाल महाराज यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.

सदर कार्यक्रमास प्रबोधनपर मार्गदर्शन करताना सत्यपाल महाराज म्हणत होते कि अनिष्ट रुढी परंपरा कर्मकांड बुवा-बाबांच्या नादी लागून स्वतःचा व स्वतच्या संसाराचा सत्यानाश करुन घेऊ नका, देवा नवसाच्या नावाखाली पशु पक्षांचे बळी देऊन हत्या करून नका हि हात जोडून कळकळीची विनंती करुन भावनिक साद घातली. रयतेसाठीचे लोककल्याणकारी सुराज्य ही छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण होळकरशाहीने पुढे मोठ्या नेटाने टिकवली, वाढवली,जनहिताची व लोकोपयोगी अनेक कामे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी राबविली.गंगाई सामाजिक प्रतिष्ठान मार्फत शिदोड येथे कोरोना काळ वगळता सालाबाद प्रमाणे वैचारिक प्रबोधनात्मक जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास माजी मंत्री सुरेश नवले शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा ज्योती मेटे मॅडम, जेष्ठ पुरोगामी नेत्या, प्रा. सुशिला मोराळे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, शेकाप



माजलगांव तालुका चिटणीस भाई लहुराव साळुंखे, मल्हार सेना महिला आघाडीच्या मिना देवकाते, गेवराई शेकाप तालुका चिटणीस भाई वाल्मिक कदम, शेकाप पैठण तालुका चिटणीस भाई चंद्रशेखर सरोदे, गेवराई पुरोगामी विचार मंचचे संजय येवले, शेकाप बीड तालुका चिटणीस अँड. भाई राजेंद्र नवले, धनगर समाजाचे सामाजिक अभ्यासक कचरू चांभारे सर, संविधान अभ्यासक मिथुन जोंगदड ,मुकेश गाडेकर, जय मल्हार युवा सेनेचे नेते अँड राजेंद्र शिंदे, ओबीसी सामाजीक कार्यकर्ते मदने रमेशराव,नारायण धापसे, एकनाथ ढोरमारे शिदोड गांवचे सरपंच तोडकर उपसरपंच रणजित कदम, युवा नेते अमर वाघमोडे, पत्रकार अंकुश गवळी, प्रा.संदीप गांडगे, प्रा.शंकर घाडगे सर,गणेश कदम, पांडुरंग शेंडगे , ऍड राजेश शिंदे, ऍड वडमारे, रासपा चे काकासाहेब कानडे, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ, महिला व युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा नितीन गायकवाड बीड जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रा. दत्तात्रय प्रभाळे यांनी विशेष परिश्रम घेतलेया कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कमेटी सदस्य भाई आकाश निर्मळ यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले.



बीड - वाघमारे अजय अनिल यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना इरफान मोहम्मद, माजीद मोमीन, सुलतान शेख,अमोल मडावी, गुड्डू मोमीन व माजीद भाऊ मित्र मंडळ

# अहिल्यादेवी होळकर यांचा राज्य कारभार कायम आदर्श राहिला-डॉ.योगेश क्षीरसागर

## रायमोहा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शोभायात्रा

बीड (प्रतिनिधी)

राजमाता अहिल्याबाई होळकर या एक कुशल प्रशासक, पराक्रमी योध्या होत्या. त्यांची राज्यकारभाराची कार्यपद्धती आदर्श राहिला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी



होळकर यांच्या जयंतीनिमित्त शोभायात्रेचे आयोजन केले होते. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. त्यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी रायमोहाचे सरपंच जालिंदर सानप, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष भागवत गाडवे, उपाध्यक्ष आजिनाथ गाडेकर, धनगरवाडी, टाकळवाडी सरपंच साईनाथ कैतके, सांगळवाडी,डिसलेवाडी, दत्तनगर ग्रुप ग्रामपंचायत सरपंच बाळकृष्ण ढाकणे, दिलीप जायभाय, हटकरवाडी- आवळवाडी ग्रुप ग्रामपंचायत सरपंच चिंतामणी नागरगोजे, गणेश जायभाय, रवी जायभाय, नितीन आरेकर, सतीश राममरे, निलेश सोनसळे, गणेश सगर आदी उपस्थित होते.

# महात्मा फुले सावित्रीबाई फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळेच शैक्षणिक, आर्थिक शिखर गाठता आले-मिलिंद घाडगे



परळी (प्रतिनिधी)

परळी तालुक्यातील टोकवाडी येथे वंचित बहुजन आघाडी शाखेच्या वतीने दहावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करताना मिलिंद घाडगे यांनी सांगितले की या देशांमध्ये एससी, एसटी ,ओबीसी, अल्पसंख्यांक यांना शिक्षणाची संधी नव्हती शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक ,सांस्कृतिक सर्वच पातळ्यावर

बहिष्कृत असलेल्या समाजाला खऱ्या अर्थाने विकासाच्या मार्गावर व शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणारे महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले हेच शिक्षणाचे खरे देवता आहेत. फुले दांपत्याच्या शैक्षणिक धोरणाला राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वांना समान शिक्षणाची सक्ती करून गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची सोय ही सरकारची जिम्मेदारी आहे असा कायदाच करून बाबासाहेब आंबेडकरांनी या नाही रे वर्गाला सर्व क्षेत्रांमध्ये प्रगतीपथावर आणले या महामानवांचे योगदान आपल्याला नाकारता येणार नाही ज्या ज्या विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डात विशेष प्राविण्य मिळवले अशा विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यामध्ये खूप मोठे व्हावे तहसीलदार, कलेक्टर ,डॉक्टर, इंजिनिअर, हायकोर्ट ,सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश होऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक विचार तळागाळापर्यंत पोहोचवून गोरगरिबांना शिक्षणासाठी मदत करावी असे मत व्यक्त केले याप्रसंगी तुकाराम महाराज मुंडे यांनी सुद्धा गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस मंगलमय शुभेच्छा व्यक्त केल्या वंचित आघाडीचे एजाज शेख यांनीही याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात दहावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी कु. स्नेहल विष्णुपंत मुंडे, सोनाली प्रदीप मुंडे, प्राची पांडुरंग शिंदे ,समता बनसोडे, अश्विनी कांदे, आर्या गरजे, शामल संजय सर्वदे, वैभव शिंदे ,राहुल भगवान राजभोज ,सिद्धांत सोमनाथ रोडे, गणेश दयानंद गायकवाड या विद्यार्थ्यांचा वंचित बहुजन आघाडी शाखा टोकवाडी च्या वतीने मान सन्मान सत्कार करून गुणगौरव करण्यात आला याप्रसंगी वंचितचे जि. युवा उपाध्यक्ष साहेबराव रोडे, ता. युवा अध्यक्ष राजेश सरवदे, ता. उपाध्यक्ष सुभाष रोडे, ता. उपाध्यक्ष संतोष वावळे, नवनाथराव मुंडे ,शेख अलाउद्दीन ,प्रदीप रोडे ,पंढरीनाथ मुकुंद बनसोडे ,पांडुरंग शिंदे, संघर्ष वामन भावे इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीपजी भालेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन माऊली मुंडे सर यांनी व्यक्त केले या कार्यक्रमाला गावातील सर्व समाज बांधव महिला पुरुष प्रतिष्ठित व्यक्ती प्रचंड संख्येने उपस्थित होते.




# अनावश्यक खर्चाला फाटा ; अनाथांसोबत जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

**सामाजिक उपक्रम; सहारा अनाथालयात बंजारा क्रांती दलाचा स्तुत्य उपक्रम**

गेवराई (प्रतिनिधी)

सध्या वाढदिवस म्हटलं की ढोल ताशा अन् फटाक्यांची अतिषबाजी तसेच चौका चौकात डिजिटल फ्लेक्स अशा पद्धतीने सर्वत्र धुमधडाक्यात वाढदिवस साजरे केले जातात परंतू या सर्व गोष्टींना छेद देत बंजारा क्रांती दलाच्या पुढाकाराने जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांचा वाढदिवस अनावश्यक खर्चाला फाटा देत गोविंदवाडी येथील बालग्राम सहारा अनाथालयात अनाथ विद्यार्थ्यांसोबत सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल बंजारा क्रांती दलाच्या पदाधिकाऱ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे. गेवराई शहरापासून काही अंतरावर असलेल्या सहारा अनाथालयात अनावश्यक खर्चाला फाटा देत बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. दरम्यान आ लक्ष्मण पवार, बंजारा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष देविदास राठोड, युवा नेते श्यामराव पवार ,गीताभाभी पवार सह विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी शिक्षक ,डॉक्टर, इंजिनिअर, वकील तसेच पत्रकार बांधवांसह अनेकांनी जिल्हाध्यक्ष चव्हाण यांच्यावर दुरध्वनीद्वारे शुभेच्छाचा वर्षाव केला. बंजारा क्रांती दलाकडून नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवले जातात यामध्ये ऊसतोड मजुरांना कपडे वाटप, महिलांना साड्यांचे वाटप, दिपावली निमित्ताने फराळ वाटप, थंडीत ऊसतोड मंजुरीसाठी ब्लॅकेट वाटप, दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच निराधारांना मदत यासह विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरम्यान शनिवारी सहारा अनाथालयात अनाथ विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी छगनराव पवार, रमेश राठोड, परमेश्वर राठोड, सुधीर राठोड ,. गोवर्धन मामा राठोड, सुरेश राठोड, बंडू राठोड ,एकनाथ राठोड, कृष्णा राठोड. ,संजय आंधळे सर, विलास चव्हाण, . राजू पानखडे ,शेषराव राठोड, परमेश्वर चव्हाण,. बाळू चव्हाण, सरपंच कृष्णा राठोड, संतोष राठोड., कुणाल राठोड,. प्रकाश पवार यांच्या सह नातेवाईक, मित्र परिवार, बंजारा समाज बांधव तसेच सहारा अनाथालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई येथील संगीन मस्जिद इनामी जमीन विक्री प्रकरणी वक्फ बोर्डाच्या चेअरमन कडे मनसेची तक्रार!

## खरेदी विक्री करणाऱ्या वर गुन्हा नोंद होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार - वर्षाताई जगदाळे


बीड (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथील मस्जिद संगीन यांची नावे असलेली इनामी जमीन बेकायदेशीर खरेदी विक्री प्रकरणात यापूर्वीही महाराष्ट्र नवनिर्माण सेने कडून तक्रार देण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगर येथे वक्फ बोर्डाच्या कार्यकारी अधिकारी यांच्याकडे कारवाई करण्यासंदर्भात संपूर्ण कागदपत्रासह तक्रार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वक्फ बोर्डाचे चेअरमन यांची छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन अज्ञात इसमा विरोधात तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदन दिले आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मंदिर, मज्जिद व दर्गा यांच्या जमिनीवर भूमाफियांनी अवैधपणे कब्जा करत खरेदी विक्री सुरू केलेली आहे. सन १९७४ ला सांगीन मस्जिद दर्ग्याला तब्बल २७६ एकर १८ गुंठे जमीन सेवेसाठी



बहाल करण्यात आली होती. ही जमीन सर्वे नंबर १० मध्ये येते. इनामी जमिनीचा नोंद पत्रक नमुना ९ मध्ये नोंदणीकृत असताना संबंधित व्यक्तींनी बेकायदेशीर या जमिनीची खरेदी विक्री केलेली आहे. या संदर्भातील सर्व पुरावे वक्फ अधिकारी व वक्फ बोर्डाचे चेअरमन यांच्याकडे देण्यात आले आहे. संबंधित जमिनीवर अतिक्रमण करत प्लॉटिंग करणाऱ्या विरोधात तत्काळ कायदेशीर कारवाई करावी ही जागा सर्वे नंबर २१० ,२१८ ,१४०, १४२ ३०८,३०९, ३२९, ३४४ ,३४५, ३८३ यामध्ये आढळून येते. बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी इनामी जमीन खरेदी विक्री बॉण्ड वर झालेली आहे. बीड जिल्ह्यातील वक्फ अधिकारी व सदस्य हे काय करत आहेत. अंबाजोगाई येथील प्रकरण अत्यंत गंभीर असून छत्रपती संभाजी नगर येथील वक्फ कार्यालयात यापूर्वीही मनसेच्या वतीने कारवाई करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. वक्फ बोर्डचा संपूर्ण कारभार व देखरेख ची जबाबदारी असणारे विधान परिषद आमदार व चेअरमन यांच्याकडेही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वर्षाताई जगदाळे यांनी निवेदन दिले आहे. येत्या पंधरा दिवसात या प्रकरणात कायदेशीर कारवाई न झाल्यास वक्फ अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर मनसे घंटा नाद आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.

# ढेकणमोहा येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



ढेकणमोहा (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे प्रतीवर्षी प्रमाणे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते करण्यात आले. यां कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अरुण नाना डाके माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड याची उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रसंगी अरुण नाना डाके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राजमाता अहिल्याबाई होळकरांनी या एक चाणक्य आणि सुधारणावादी राज्यकर्त्यां होत्या त्यांनी महिलां सक्षमीकरण आणि समाज कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र काम केले आसे बोलताना सांगीतले, या कार्यक्रम प्रसंगी नागेश शिंदे माजी सरपंच, हानुमान देवकते, केलास देवकते, भगवान देवकते, रामा भोगे, महादेव थापडे, उपसरपंच परमेश्वर थापडे, लक्ष्मण ठाकुर, भास्कर देवकते, ज्ञानदेव देवकते, कोयटे शिवाजी सर, डॉ. खेडकर, विजयसिंह ठाकुर, दयाराम पवार, डिगाबर देवकते सर, जगतसिह ठाकुर, बळीराम थापडे, श्रीकीसन देवकते, शामराव राऊत, बाजीराव पवार, रमेश ठाकूर, रमेश देवकते, उत्तम देवकते, दिलीप देवकते, राधाकिसन थापडे, अंगद तुकडे, शामराव देवकते, शरद देवकते ग्रामपंचायत सदस्य, नंदु शिंदे ग्रामपंचायत सदस्य, भारत देवकते, शामराव जाजु, अभिषेक देवकते ,ज्ञानेश्वर देवकते, रामकिसन करांडे, विकास देवकते, महादेव शिंदे, रामा चौरे, पवन चौरे, जालिंदर भोगे, अरविंद शिंदे, बापुराव शिंदे, पोपट शिंदे, महादेव देवकते आधी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमांचे सुत्रसंचलन शामराव राऊत यांनी केलं तर कार्यक्रमाचे आभार आयोजक हानुमान देवकते यांनी मांनले.

# लिंबागणेश येथे कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर जयंती साजरी

## शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती श्लोकांना विरोध हिच खरी आदरांजली:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथे आज दि.३१ मे शुक्रवार रोजी कर्मयोगीनी पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांची त्रिशताब्दी जयंती ग्रामपंचायत कार्यालय येथे माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी अहिल्यामाता यांचा जीवनपट उलगडून सांगताना अहिल्यामाता यांच्या शासन व्यवस्थेच्या कालावधीत अनेक धार्मिक स्थळांचा जिर्णोद्धार केला.धर्मशाळा रस्ते, दवाखाना यांची निर्मिती करताना वस्तुशिल्पी, शिल्पकार, गवंडी, लोहार, सुतार,सोनार, चर्मकार अशा अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना मदतीचा हात देताना करवसुलीची मर्यादा निश्चित ठरवून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना जादा शेतसारा द्यावा लागत नसे.शेती पुर्णतः पाण्यावर अवलंबून असल्याने तलाव, विहीर घाट,कुंडाची निर्मिती केली.यावेळी बाळासाहेब मुळे रमेश गायकवाड, समीर शेख,नाना वाणी यांची समयोचित भाषणे झाली.कार्यक्रमांचे सुत्रसंचलन बाळासाहेब मुळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले. ग्रामपंचायत कार्यालय ते पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर चौकापर्यंत ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढत अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परीसर दुमदुमला होता.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स.श्रीहरी निर्मळ,दामु थोरात,महादेव कुदळे, अर्जुन घोलप,अशोक जाधव, जीवन मुळे,कल्याण वाणी, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, भालचंद्र गिरे, अँड.गणेश वाणी, सुखदेव वाणी,गणपत तागड, संतोष भोसले,रामदास मुळे, शिवाजी वाणी,दादा गायकवाड ,संजय घोलप, सुरेश ढवळे,संदिप मुळे,नवनाथ मुळे,श्याम गिरे, विशाल लगास,शहादेव धलपे , रामकिसन गहिरे,शुभम कोकाटे, विनायक वाणी,सुदाम



गिरे, रामचंद्र गिरे, चंद्रकांत आवसरे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

अहिल्यामाता होळकर यांनी राज्यकारभार चालवताना अनिष्ट रूढी , समाजविघातक परंपरा यांना पायबंद घातला. सती प्रथा बालविवाह ,केशवपन या अनिष्ट प्रथा त्यांनी बंद केल्या.त्यासाठी कठोर कायदे करून अंमलबजावणी केली अहिल्यादेवींच्या विचारांचा आणि कार्याचा दैदिप्यमान वारसा सांभाळत वाटचाल करताना ज्या मनुस्मृतीत बहुजण समाजावर आणि महिलांवर अन्याय करणारे श्लोक आहेत ज्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले होते त्या मनुस्मृतीच्या श्लोकांचा महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट करण्यात यावेत या प्रस्तावाला कडाडून विरोध करणे हिच पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन केले.

# शिवराज्याभिषेक सोहळा भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन ६ जून 'लोकोत्सव'

## 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' ठरणार मुख्य आकर्षण

बीड (प्रतिनिधी)

कोल्हापूर : 'राज्याभिषेक' शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे सुवर्णपान, यवनी सत्तांच्या अत्याचारातून महाराष्ट्रभूमीला स्वातंत्र्याचा हुंकार देणार हा क्षण. शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार आले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला, मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला अन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदा या ऐतिहासिक घटनेस ३५० वर्षे पूर्ण होत आहेत.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२४ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. यंदा 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' कार्यक्रम शिवराज्याभिषेक महोत्सवाचे आकर्षण बिंदू असणार आहेत. देशभरातील लाखो शिवभक्तांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.



ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हा ... गंगाधर काळकुटे, पूजा मोरे, ऋषिकेश बेदरे,गोपाळ धाड़े यांची पत्रकार परिषदेत माहिती

यंदा गडावर पाच जूनला सायंकाळी पाच वाजता 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची' हा शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम होणार आहे. महाराष्ट्रातील युद्धकला आखाड्यांचा यात सहभाग असणार आहे. महाराष्ट्राची पारंपरिक युद्धकला कशी असते, याचे दर्शन गडावर येणाऱ्या तमाम देशवासियांना व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. पट्टा, तलवार, भाला, विटा, जंबिया, कट्यार, माडू, फरी गदका यांच्या विविध प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. सायंकाळी सात वाजता राज दरबार येथे 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' हा शाहीरी कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील शाहीर सहभाग घेणार आहेत.

त्याचबरोबर ६ जूनला मेघडंबरीतील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला सुवर्ण नाण्यांचा अभिषेक झाल्यानंतर 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' या पालखी मिरवणुकीत महाराष्ट्रातील बारा बलुतेदार, अठरा अलुतेदारांसह सर्व धर्मातील लोक सहभागी होणार आहेत. आपापल्या पारंपरिक लोककलांचा मिरवणुकीत जागर घालणार आहेत. राजसदर, नगारखाना, होळीचा माळ, बाजारपेठ ते जगदीश्वर मंदिर असा पालखी सोहळ्याचा मार्ग असेल. या मार्गावरून पालखीवर पुष्पवृष्टी केली जाणार आहे.

# माजलगाव ग्रामीण भागात अवैध दारु विक्री कोणाच्या छत्र छायेत धडाक्यात सुरु

## १५ ते १६ वयोगटातील तरुण पासून ते वय वर्धा प्रयन्त या व्यसनाचे बळी

कोळी साहेब ग्रामीण भागाकडे लक्ष देण्याची गरज..

माजलगाव (प्रतिनिधी)

सरकारला विसर पडला आहे. बकाल झालेल्या खेडेगावांतही दारू सहज उपलब्ध होते. यासाठी गावांत मान्यताप्राप्त दुकाने असलीच पाहिजेत, असे अजिबात नाही. मराठवाड्याच्या शहर व ग्रामीण भागात अवैध दारूविक्री धडाक्यात सुरु आहे. काही गावांतील अख्खी तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेली आहे. १५ ते १६ वयोगटातील तरुण देखील या व्यसनाच्या आहारी गेली आहे. घरी एक वेळ जेवण नसले तरी चालेल पण सकाळी चहा च्या आधी दारू पिण्यासाठी लागते अश्या प्रकारे खुपजास्त प्रमाणात दारूची वेसण लागले आहे, या दारूमुळे कित्येक गावातील अख्खेच्या अख्खे कुटुंब बरबाद झाले आहे. दारू विक्री करण्यांना हितका धाडस येतो तरी कुठून ज्या पध्दतीने खुले आम दारूची विक्री केली जाते. परवाने, मान्यता नसलेली ही दारुविक्री संबंधित यंत्रणांना हप्ते न देता सुरू असते का? असा देखील प्रश्न निर्माण

होत आहे. हप्ते दिले जात नाहीत, असे गृहीत धरले तरी असे प्रकार राजरोसपणे कसे सुरू राहू शकतात. गावठी दारुविक्री, देशी, विदेशी दारूची बेकायदेशीर विक्रीला कुठे तरी आला बसण्याची गरज आहे. अवैध दारुविक्रीवर बंदी घालण्यासाठी पोलिसांकडून म्हणावे तितके सहकार्य मिळत नाही, अशी उत्पादन शुल्क विभागाची तक्रार असते. शिवाय गावोगावी

पोलिसपाटलांची नियुक्ती केलेली असते. गावातील अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांना देणे हे पोलिसपाटलांचे काम असते. दारूची बेकादेशीर विक्री होत नाही, असे एकही गाव नसेल. पोलिसपाटलांकडून याची माहिती पोलिस ठाण्यांना दिली जाते. त्यानंतर पोलिसांकडून कारवाई केली जाते. त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी संबंधित ठिकाणी दारूची विक्री सुरू होते. या प्रकारांची माहिती उत्पादनशुल्क मंत्री आणि गृहमंत्र्यांना नाही, यावर एखादा भाबडा माणूसच विश्वास ठेवू शकतो. अनेक ढाब्यांवर दारूची सर्रास विक्री केली जाते.

कोळी साहेब तुम्हाला माजलगावतील ग्रामीण भागाकडे लक्ष देण्याची गरज

माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध दारूविक्रीचे प्रमाण खूप जास्त वाढले आहे. पायतळवाडी, मंगरूळ नं.१, राजेगाव, या सारख्या अनेक गावात दारूची विक्री खुले आम होत आहे. गावांतील अख्खी तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेली आहे. १५ ते १६ वयोगटातील तरुण पासून ते वय वर्धा प्रयन्त या व्यसनाच्या आहारी गेली आहे. घरी एक वेळ भाकर नसली तरी चालेल पण सकाळी चहा च्या आधी दारू पिण्यासाठी लागते अश्या प्रकारे खुपजास्त प्रमाणात दारूची वेसण लागले आहे, या दारूमुळे कित्येक गावातील अख्खेच्या अख्खे कुटुंब बरबाद झाले आहे. गावात किराणा दुकान कमी व दारूच्या दुकानी जास्त असल्याची गावोगावी चर्चा सुरू आहे. या सर्वांवर कोळी साहेब गप्प का असा प्रश्न उपस्थित होत. यावर कोळी साहेबांनी लक्ष द्यावे अशी गावातील नागरिकांमधुन अपेक्षा बेक्ती होते आहे.



एक सामान्य बहुजन कार्यकर्त्याचा फोन सुरेश आण्णा धस यांना पाण्याच्या संबंधित नितीन आडागळे तात्काळ सुरेश आण्णा धस यांनी नगरपंचायत नगरपंचायत पाटोदा पाणीपुरवठा संबंधित सर्व अधिकाऱ्यांना फोन लगेच सर्व अधिकारी पाटोदा दलित वस्ती साठे नगरमध्ये दाखल सोबत सुरेश धस यांचे विश्वासू किशोर आडागळे गोरे नगरसेवक यांनी स्वतः बोर उपसून दलित वस्तीचा अतिशय महत्त्वाचा पाणी प्रश्न तात्काळ सोडवीला दलित वस्ती मधील सर्व नागरिकांनी सुरेश धस यांचे आभार मानले




इंजि. कृष्णा पानसंपदाच्या यांना वाढदिवसाच्या हार्दिक
शुभेच्छुक
सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार.

# लोकसभा झाली विधानसभेसाठी बाशिंग बांधणाराची प्रमाण वाढली

## लोकसभा निवडणूक झाल्यानंतर विधानसभेचे इच्छुक उमेदवार आप आपल्या कामाला लागले







## महायुतीमध्ये तिकीट एक मागणारे अनेक जातीचे गणित लावून इच्छुकांची संख्या वाढते

धारुर (प्रतिनिधी)

महायुतीत उमेदवारांची राग तर महाआघाडीचा उमेदवार शोधावा लागेल आमदार समर्थक आमदारकीचे स्वप्न पाहत आहे का ? सोशल मीडियावर येत आहेत भावी आमदार म्हणून पोस्ट लोकसभा निवडणूक झाल्यानंतर विधानसभेचे इच्छुक उमेदवार आप आपल्या कामाला लागले आहेत महायुतीचे तिकीट आपल्यालाच मिळणार या भरोशावर मतदारसंघांमध्ये संपर्क वाढवायचे काम चालू केले आहे. माजलगाव विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे आ प्रकाश सोळंके हे अग्रेसरी असले तरी भारतीय जनता पार्टीचे रमेशराव आडसकर, मोहन जगताप तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जयसिंग सोळंके तसेच जातीपातीचा अंदाज लावून सोशल मीडियावर भावी आमदार चे पोस्ट फिरत आहेत ते माधव निर्मळ, बाबरी मुंडे आशा इच्छुकांची संख्या महायुतीमध्ये वाढत आहे. ही खरी वरिष्ठांची डोकेदुखी ठरणार आहे. तर महाआघाडीचा सध्यातरी उमेदवार आपल्याला दिसत नसला तरी या महायुतीच्या इच्छुकापैकीच एक दिसला तर नवल नाही.लोकसभेच्या निवडणुकीनंतर विधानसमा निवडणूक लागणार असल्याने निवडणुकीसाठी इच्छुकांची गर्दी मोठ्या संख्येने वरचेवर वाढतच आहे. जातीपातीचे राजकारण करून आपण आमदार होऊ असा भास अनेकांना होताना दिसत आहे. माजलगाव मतदारसंघांमध्ये विद्यमान आ प्रकाश सोळके हे प्रमुख महायुतीचे दावेदार असले तरी या लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालानंतर यात फेरबदल होऊ शकतो. पण विद्यमान आमदारांना महायुतीच्या वरिष्ठांना डावलने ही शक्य होणार नाही. तर नवीन उमेदवाराचा नंबर लागू शकतो या आशेवर अनेक उमेदवार बाशिंग बांधून लाईन मध्ये उमे आहेत माजलगाव मतदारसंघांमध्ये मागील निवडणुकीत थोड्या मताने पराभूत झालेले. पाच वर्षापासून मतदारसंघाच्या संपर्कात राहून आडी अडचणीला आलेले रमेशराव आडसकर हे भारतीय जनता पार्टी कडून अग्रस्थानी असल्याचे आपल्याला दिसत आहे तर मागील निवडणुकीत माधार घेतलेले मोहन जगताप तसेच युवा नेतृत्व जयसिंग सोळंके हेही निवडणूक लढविण्याच्या तयारीमध्ये आपल्याला दिसत आहेत. या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये जातीपातीच्या राजकारणामध्ये धारूर येथे धनगर युवक मेळाव्याचे आयोजन करून चर्चेमध्ये आलेले आमदार प्रकाश सोळंके

## सारडगाव येथील सुरेश श्रीहरी बोबडे यांचे निधन

परळी (प्रतिनिधी)

तालुक्यातील मौजे सारडगाव येथील शेतकरी सुरेश श्रीहरी बोबडे (५१) यांचे आज रविवार,दि.०२ जून २०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सुरेश श्रीहरी बोबडे यांच्यावर पार्थिवावर सारडगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.राख सावडण्याचा विधी मंगळवार, दि.०४ जून रोजी सकाळी ७ वा. होणार आहे. पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी तथा परळी वैजनाथ-अंबाजोगाई पंचायत समिती कर्मचारी पतंसंस्थेचे व्हाईस चेअरमन निळकंठ दराडे यांचे ते मेहुणे होत.

तालुक्यातील मौजे सारडगाव येथील शेतकरी सुरेश श्रीहरी बोबडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मागील काही दिवसांपासून प्रकृती अस्वस्थ असल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रविवार दि. ०२ जून २०२४ पहाटे ०२ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली मृत्यू समयी ५१ वर्षे होते. शेतकरी कै.सुरेश श्रीहरी बोबडे हे अत्यंत मनमिळावू व धार्मिक स्वभावाचे होते. यांच्या निधनाने सारडगाव व तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सारडगाव येथील शेतकरी सुरेश श्रीहरी बोबडे यांच्या पाश्चात्य एक बंधु, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, असा मोठा परिवार आहे.

कै.सुरेश बोबडे यांच्या पार्थिवावर मुळ गावी सारडगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या या अंतयात्रेत सर्व स्तरातील नागरिक, राजकीय, व्यापारी, वकील, शिक्षक, प्राध्यापक, पोलीस कर्मचारी व नातेवाईक मोठया प्रमाणात उपस्थित होते. कै.सुरेश श्रीहरी बोबडे यांच्यावर कोसळलेल्या दुःखात परिवार सहभागी आहे.

## संघर्षयोद्धा मराठी चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने धारूर शहरातील नागरिकांशी कलाकारांनी संवाद साधला



किल्लेधारूर । प्रतिनिधी

संघर्ष योद्धा या मराठी चित्रपटाचा प्रमोशनच्या निमित्ताने चित्रपटातील कलाकार यांनी धारूर शहरातील धनलक्ष्मी अर्बन बँकेच्या परिसरामध्ये नागरिकांशी संवाद साधून येत्या १४ जून २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणाऱ्या चित्रपट पाहण्याचे आवाहन केले.

मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित संघर्ष योद्धा हा मराठी चित्रपट १४ जून २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्र प्रदर्शित होत आहे या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने धारूर शहरात कलाकारांनी उपस्थित राहूनशहरातील नागरिकांना चित्रपट पाहण्याचे आव्हान केले. यावेळी चित्रपट अभिनेते रोहन पाटील चित्रपटाचे लेखक, निर्माते त्यांचे सर्व सहकारी आणि धारूर होते.शहरातील बालासाहेब जाधव, सुरेश शेळके, संदीप शिनगारे प्रशांत शिनगारे सह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

## वर्षभरापासून ८ लक्ष रुपयांचा निधी पडुन स्मशानभूमीचे काम रखडल्याने उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ

### लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नाही:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे जुन्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन बांधकाम कोसळल्याने व पत्रे उडून गेल्याने नविन स्मशानभूमी बांधकाम करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली स्मशानभूमी मध्ये सरण रचुन त्यावर ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.त्यानंतर आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजने अंतर्गत मुलभुत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षांकरिता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपये मंजूर करत दि.३१ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती.मात्र त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हलगर्जीपणामुळे वर्षभरापासून काम




रखडलेल्या अवस्थेत असुन आज दि.२ रविवार रोजी पहाटे लिंबागणेश येथील भीमा विठ्ठल भोजणे यांचे दिर्घ आजाराने निधन झाले.त्यांचा अंत्यविधी गावच्या सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये उघड्यावर अंत्यसंस्कार करावा लागला.पावसाळा सुरू होणार असल्याने पावसाळ्यात स्मशानभूमी अभावी मृतदेहाची हेळसांड होणार असुन लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाला यांचे गांभीर्य नसल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी दिसून येत आहे.

लिंबागणेश येथील लगडलेल्या स्मशानभूमीचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी तातडीने करण्यात यावे यासाठी दि.२४ मे रोजी डॉ.गणेश ढवळे यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.पं.) जिल्हा परिषद बीड डॉ.ज्ञानोबा मोकाटे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनानंतर दि.२७ मे रोजी डॉ.मोकाटे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड अनिरूद्ध सानप यांना लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे रखडलेल्या काम प्रकरणात तातडीने संबंधितांना नोटीस पाठवुन तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत असुन अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असून अंत्यसंस्कार दरम्यान काही गावांमध्ये ग्रामस्थांमध्ये वादविवाद होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याच्या घटना दुर्दैवाने घडत आहेत. नुकतेच बीड तालुक्यातील पालवण येथे गेल्या महिन्यात मागासवर्गीय व्यक्तीचा अंत्यसंस्कार करण्याच्या वादानंतर अट्रासिटीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.याविषयी लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नसल्याचे दिसून येते.

# मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचा चढता आलेख लाख मोलाची मदत बाजीराव चव्हाण

मे महिन्यात ६० रूग्णांना ४०,७५००० हजार मदत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड मदतीचा आधार.आडल्या नडलेल्या रुग्णांना मदतीला धावून जात शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपचारासाठी गरीब रुग्णांना आर्थिक आधार देत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संकल्पित या वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील गरजू रुग्णांना लाखोंची मदत करण्यात आली. असल्याची माहिती बीड जिल्ह्याचे धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी दिली. पैशाअभावी आजारवरील उपचार थांबावा लागतो. आजारपणात गरीब रुग्ण उपचार घेण्याऐवजी आजारपणाशी संघर्ष करत असतात त्यांना हा संघर्ष करावा लागू नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रभावीपणे कृतिशील व गतिशील केले आहे. याच कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू रुग्णांना अर्थसाह्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक मंगेश चिवटे यांच्यावर संबंधित कक्षेच्या जबाबदारी असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अनेक रुग्णसेवक निस्वार्थपणे कक्षाचे काम करत आहेत.जिल्ह्यातही या कक्षाचे काम वेगाने सुरू असून शिवसेना वैद्यकीय जिल्हा प्रमुख महादेव मतकर हे रुग्णांना उपचार खर्चात सवलत मिळवून देण्याचे कर्तव्य बजावत आहेत. बाजीराव चव्हण वैद्यकीय सहाय्यक यांच्या सहकार्यातून महिन्यात ४०,७५००० एवढी आर्थिक मदत रुग्णांना मिळवून देण्यात आली आहे.अशी माहिती बाजीराव चव्हाण यांनी दिली. अर्थसाह्यय मिळालेल्या रुग्णांची नावे पुढीलप्रमाणे१) रहीबाई गोविंद खेडकर, मेंदू रोग ५०००० हजार

२) सर्जेराव श्रीपती घुले, हृदयरोग १ लाख रुपये ३) पांडुरंग अभिमान आवारे,अपघात ५०००० हजार ४) बाबाजी जगन्नाथ बाभळ, हृदयरोग १००००० लाख ५) शिलाबाई विष्णू नागरगोजे, केमोथेरपी ५०००० हजार ६) कल्याण रामभाऊ मिसाळ,मेंदूरोग ५००००हजार ७) प्रियंका राहुल भविशन,नवजात बालक ५०००० हजार ८) शितल जगन्नाथ मानकर,नवजात बालक ५०००० हजार ९) कविता बाळू घोडके,नवजात बालक ५०००० हजार १०) प्रशांत महादेव थोरात, मेंदू रोग १००००० लाख ११) जयश्री सोमनाथ मरकड,नवजात बालक ५०००० हजार १२) बाळासाहेब गहिनीनाथ कांबळे,हिप रिप्लेसमेंट १००००० लाख १३) नवनाथ रंगनाथ बांगर, नी रिप्लेसमेंट१००००० लाख १४) दत्ता बाबुराव घिगे,अपघात ७५०००हजार १५) आरती संदीप धुमाळ,नवजात बालक ५०००० हजार १६) सुरेखा सुरेश दुधाळ,अपघात १०००००लाख १७) निकिता अजिनाथ वाघमारे, अपघात१००००० लाख १८) शहादेव महादेव जगदाळे,अपघात७५००० हजार १९) अर्जुन रामकिसन नाईकवाडे, हिप रिप्लेसमेंट १००००० लाख २०) आर्यन रवींद्र आदागळे,मेंदू रोग ५०००० हजार २१) पल्लवी रवींद्र टेकाळे नवजात बालक ५०००० हजार २२) अमर केशव साळवे मेंदू राव ५० हजार २३) छबुताई अनुसा शिंदे नी रिप्लेसमेंट ५०००० हजार २४) सुलोचना बाळू जाधव नवजात बालक पन्नास हजार २५) दगडूबाई मारुती शिंदे हृदयरोग ७५००० हजार २६) शकुंतलाबाई किसन कदम केमोथेरेपी पन्नास हजार २७) प्रशांत धनराज वाशिमकर अपघात एक लाख २८) फारूक जिलाबी तांबोळी अपघात ५०००० २९) राजेश राजू प्रसाद मिश्रा केमोथेरेपी पन्नास हजार ३०) तेजश्री शिरीष वाशिमकर नी रिप्लेसमेंट ५०००० ३१) प्रभावती गंगाराम पाटील अपघात एक लाख ३२)



वैजनाथ सोपान पोकळे मेंदूराव ५०००० ३३) विनायक सुखदेव कांबळे हीप रिप्लेसमेंट ७५००० ३४) अरुण पितांबर पाटील अपघात एक लाख ३५) ज्ञानेश्वर ईश्वर गायके पन्नास हजार ३६) मनियार इब्राकली इक्राम हृदयरोग पन्नास हजार ३७) शांतीलाल राजू देदिया हृदयरोग एक लाख ३८) प्रतिभा विशाल खेडकर नवजात बालक पन्नास हजार ३९) पांडुरंग हरिदास गुरूकुदे हीप रिप्लेसमेंट एक लाख ४०) सकाळी मोहन निकम मेंदू रोग एक लाख ४१) सना मयूर शेख नवजत बालक ५० हजार ४२) बाळू किसन आगरकर मेंदू रोग पन्नास हजार ४३) साधना दत्तात्रय मावसकर नवजात बालक पन्नास हजार ४४) मनीषा पवन काळे नवजत बालक ५०००० ४५) अमृतराव श्रीरंग रसाळ हृदयरोग एक लाख ४६) निशा अमोल पंडित नवजात बालक ५०००० ४७) संगीता राम शिंदे मेंदू रोग ५०००० ४८) श्री नारायण संजय कदम मेंदू रोग एक लाख ४९) नंदनी विजय चादर नवजात बालक ५०००० ५०) शिवा सुरज घाडगे नवजात बालक एक लाख ५१) नवनाथ दत्तात्रेय गवते मेंदू रोग ५० हजार ५२) सचितानंद रामकृष्ण सोळुंके अपघात एक लाख ५३) बबनबाई केरबा कदम कर्करोग ८०००० हजार ५४) सुशाला गोपाळ बडे हृदयरोग एक लाख ५५) पायल रोहित पवळे नवजात बालक ५० हजार ५६) ज्ञानेश्वर बळीराम काकडे अपघात एक लाख ५७) धनंजय मारुती नरवडे अपघात ५०००० ५८) स्वाती शिवमहाते नवजात बालक ४५००० हजार ५९) निर्मला विठ्ठल मस्के नवजात बालक ५० हजार ६०) दामू श्रीरंग कोरडे हीप रिप्लेसमेंट एक लाख रुपयेगोरगरीब रूग्णांच्या हक्काचे ठिकाण म्हणजे धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष-: बाजीराव (दादा) चव्हाण यांनी चालु केलेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड गरजु रुग्णांनी अवश्य संपर्क साधावा

पत्ता-:रेणु हॉस्पिटल समोर, मुक्ताई बिल्डिंग,धांडे नगर, बार्शी रोड बीड संर्पक क्रमांक -:९१४३७८७७७७/९१४३७१७७७७

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT